# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/२०१९/ 1786 दिनांक : 26 APR 2019

प्रति,

१) प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकतन पुणे / अवसरी / कराड /
मिरज / तासगांव / कोल्हापूर / सोलापूर

२) प्राचार्य / संचालक,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अवसरी / कराड / पुणे.

**विषय :- दिनांक ०२.०४.२०१९ रोजी, तंत्रशिक्षण संचालनालयातील विभागीय सहसंचालकांचे आढावा बैठकीमध्ये मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व मा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी बैठकीमधील मुद्यांचे अनुषंगाने दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने चर्चा करणेसाठी दिनांक ०५ मे, २०१९ (रविवार) रोजी बैठक.**

संदर्भ :- दिनांक ०२.०४.२०१९ रोजी, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे कार्यालयामध्ये विभागीय सहसंचालकांची घेण्यात आलेली आढावा बैठक.

उपरोक्त संदर्भिय आढावा बैठकीमध्ये मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांनी, विभागीय सहसंचालक यांना बैठकीमधील मुद्यांचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने बैठकीतील मुद्यांबाबत संस्थास्तरावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करणेसाठी दिनांक ०५.०५.२०१९ रोजी, सकाळी १०.३० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, पुणे (संगणक विभाग, कॉन्फरन्स हॉल) येथे बैठक आयोजित केलेली असून, संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेशी संबंधित मुद्देनिहाय माहितीसह उपस्थित रहावे. तसेच सदर बैठकीस संस्थेतील सर्व विभागप्रमुख/प्र.विभाग प्रमुख यांना सुध्दा उपस्थित राहण्यास सांगावे सर्वांची उपस्थिती अनिवार्य आहे यांची नोंद घ्यावी . आढावा बैठकीमध्ये चर्चा करण्यात आलेल्या मुद्यांबाबतचे संचालनालयाचे पत्र माहितीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

(डॉ.दि.रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०२३३४७६, २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in

**बैठकीची सूचना** क्रमांक : १६/आस्था/आढावा बैठक/२०१९/ ७६

**बैठक दिनांक :०२.०४.२०१९** दिनांक : 20/3/19

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

संचालक,

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

मुंबई.

**विषय : विभागीय सहसंचालक आढावा बैठक - दिनांक ०२.०४.२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयातील, विभागीय संहसचालकांची आढावा बैठक **दिनांक ०२.०४.२०१९रोजी सकाळी ११.००** वाजता सिडनेहॅम,चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग हे उपस्थित राहणार आहेत.

सदर आढावा बैठकीबाबतचे मुद्दे खालील प्रमाणे देण्यात येत आहे. सदर नमूद मुद्दाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाशी संबधित मुद्दाबाबतची माहिती / अभिप्रायात्मक टिप्पणी या कार्यालयास ईमेलव्दारे (soft copy) दिनांक २८.०३.२०१९ रोजी ५ वाजेपर्यंत सादर करावी व बैठकीच्या वेळी सोबत आणावी.

**बैठकीचे मुद्दे :**

१. दिनांक १३.१२.२०१८ रोजी संचालनालयात आयोजित करण्यांत आलेल्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तामधील खालील नमूद सूचना / निर्देश यांना अनुसरून आपल्या कार्यालयाने संबंधित मुद्यांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल

(i) NBA Accrediation च्या अनुषंगाने आपल्या विभागातील शासकीय व अनुदानित संस्थाबातच्या संस्थानिहाय वस्तुस्थिती अहवाल. (Status Report)

(ii) उद्योगधंद्यासोबत संस्थांनी MOU केलेल्या बाबतची यादी अद्ययावत करणेबाबत.

(iii) शासकीय संस्थांमधील Teaching Learning Process व्यवस्थित सुरू असल्याबाबतचा आढावा व Model Curriculum चे स्वायत्त संस्थामधील Implementation बाबतची सदयस्थिती

(iv) शिक्षकांसाठी Industrial Training आयोजित करणेबाबत केलेले प्रयत्न.व विदयार्थ्यांचे Implant Training बाबतची संस्थानिहाय माहिती

(v) सर्व शासकीय संस्थांचे व विभागीय कार्यालयाचे संकेतस्थळ अदययावत असण्याबाबतची कार्यवाही.

टि१ / आस्था / (सेवा) 22/3/19

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 22 MAR 2019 3172

(vi) सर्व संस्था व विभागीय कार्यालयांचे संकेतस्थळावर Public Grievance System कार्यरत असण्याबाबतची कार्यवाही.

(vii) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शासकीय संस्थांमधून वार्षिक दिनदर्शिकेनुसार घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमाचा अद्ययावत तपशिल.

(viii) संचालनालयाचे News Letter च्या अनुषंगिक माहिती.

(ix) DBT Portal वरील विविध शिष्यवृत्ती योजनेचे प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत.

(x) शासकीय संस्थांमध्ये सुरू असलेल्या व्दितीय पाळीतील अभ्यासक्रमाचे अनुषंगाने घेतलेल्या आढाव्याबाबत.

(xi) वृक्षलागवडीच्या अनुषंगाने दिलेले उद्दिष्टय व साध्य केलेले उद्दिष्टय.

२. विभागातील शासकीय संस्थामध्ये २०१८-२०१९ मधील निधीच्या अनुषंगाने बांधकामाबातची सदयस्थिती व बांधकामाबातचे पुढील वर्षातील नियोजन

३. संचालनायाकडून उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या अनुषंगाने ३१/०३/२०१९ रोजीच्या खर्चाचा आढावा

४. न्यायालयीन प्रकरणे / अवमान याचिका याबाबतची वर्षनिहाय / न्यायालय निहाय प्रकरणांची सद्यस्थिती (MAT/Hon. High Court/Hon. Supreme Court/ Affidavit Submitted/ not submitted) संचालनालयाकडून / शासनाकडून आवश्यक असलेल्या आदेश/ सुचना याबाबतची प्रकरणनिहाय माहिती.

५. विभागातील अनुदानित संस्थांच्या मूल्यनिर्धारणाची कार्यवाही व सद्यःस्थिती.

६. वृक्षलागवड उपक्रमा अंतर्गत आपल्या विभागाच्या स्तरावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तपशिल.

७. सहसंचालकांनी त्यांच्या विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय संस्थांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल.

८. विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थांच्या N.B.A. बाबत सद्यस्थिती.

९. विभागीय कार्यालयाचे स्तरावर वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदभरती व पदोन्नती याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती.

१०. संस्थांमध्ये संशोधन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न व प्रोत्साहनपर योजनांची विभागनिहाय माहिती.

आपल्या विभागातील शासन स्तरावर प्रलंबीत असलेल्या विषयाबाबतची माहिती सुध्दा स्वतंत्रपणे सोबत आणावी. तसेच सदर बैठकीस आपण स्वतः संपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर विषय सूचीमध्ये आपल्या कार्यासनाशी संबंधित मुद्दयाबाबत आपली सविस्तर वस्तूस्थिती दर्शक अद्ययावत माहिती दिनांक २८.०३.२०१९ रोजी पर्यंत श्रीम. पेडणेकर, कार्यासन क्रमांक-१ यांच्याकडे सादर करावी व सदर माहिती श्रीम. पेडणेकर यांनी एकत्रित करून दिनांक २८.०३.२०१९ रोजी होणा-या बैठकीच्या अनुषंगाने मा.संचालकाच्या अवलोकनार्थ सादर करावी.